## प्रकरण ३

## राजाराम महाराजांच्या काळातील राजकीय चळवळी

राजाराम महाराजांनी राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचेच धोरण स्विकारुन राज्यकारभार सुरु केला होता. राजाराम महाराजांच्या कारकिर्दीत कोल्हापूरच्या ब्राह्मणोतर समाजाची शैक्षणिक प्रगती घडून आली. कारण स्वत: राजाराम महाराज उदारमतवादी होते. प्रजेला राज्यकारभारात सहभागी करुन घेण्याकडे त्यांची वाटचाल सुरु होती असे दिसते कारण १९२६ मध्ये त्यांनी कोल्हापूर संस्थानात पंचायत संस्थानचा कायदा करुन संस्थानात इलाखा पंचायत, तालुका पंचायत व ग्रामपंचायत या स्थानिक स्वराज्य संस्था निर्माण करुन या संस्थांचा प्रत्यक्ष कारभार जनतेच्या ताब्यात दिला.[१] यावरुन ते प्रजेला राजकीय अधिकार देण्याच्या विरुध्द होते असे म्हणाता येत नाही. परंतु कोल्हापूर संस्थानात जर ब्रिटिश सत्तेविरुध्द सुरु असलेली स्वातंत्र्याची चळवळ सुरु असेल तर, त्यास राजाराम महाराजांना संस्थानिक म्हणून पाठींबा देता येत नव्हता. कारण ब्रिटीश सत्तेच्या विरोधात गेल्यास संस्थान गमावले गेले असते याची भीती होती म्हणूनच मिळालेल्या सत्तेचा वापर भारतातील इतर संस्थानिकां सारखा चैन व ऐषाराम यात न करता; कोल्हापूरच्या जनतेच्या सर्वांगीन विकासासाठी करण्यात आलेला आहे असे राजाराम महाराजांच्या एकूण समाजहीताच्या केलेल्या कामावरुन स्पष्ट होते.[२]

राजाराम महाराजांच्या कारकिर्दीत १९३० पासून कोल्हापूर संस्थानात राजकीय चळवळी झाल्याचे दिसून येते. विशेष म्हणजे शाहू महाराजांच्या काळात झालेल्या राजकीय चळवळींची सूत्रे ही विशिष्ठ समाजातील लोकांकडे होती व ते स्वातंत्र्याच्या चळवळीच्या नावाखाली शाहू महाराजांनी केलेल्या

सामाजिक कामास विरोध करण्याचा प्रयत्न करीत असत असे दिसून येते. परंतु राजाराम महाराजांच्या काळात सुरु झालेल्या राजकीय चळवळीचे नेतृत्व शाहू महाराज व महात्मा फुले यांचे विचार माणना-या कार्य-कर्त्यांकडे होते. शिवाय हे कार्यकर्ते बहुजन समाजातील होते. [3]देशभर सुरु असलेली स्वातंत्र्याची चळवळ शिवाय महात्मा गांधीच्या नेतृत्वाखाली सुरु असलेली कायदेभंगाची चळवळ, परदेशी मालावर बहिष्कार, दारुबंदी, अस्पृश्यता निवारण, इत्यादी खालसा मुलखात सुरु असलेल्या चळवळींचा इथल्या संस्थानात राहणा-या जनतेवर परिणाम होत होता व त्यातूनच देशभक्तीने प्रेरित झालेल्या या तरुणांना देशासाठी स्वातंत्र्य लढयात भाग घ्यावा असे वाटत होते. सत्यशोधक चळवळीतून तयार झालेले हे कार्यकर्ते देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्याच्या लढयामध्ये सहभागी होणे सहाजीकच होते व त्यातूनच कोल्हापूर मध्ये राजकीय चळवळी सुरु झाल्या.[४]

१९२७ साली कोल्हापूरला महात्मा गांधीनी भेट दिली या वेळी त्यांची कोल्हापूरच्या खासबाग मैदानावर सभा झाली. कोल्हापूरमधील अनेक तरुणांनी महात्मा गांधींच्या भाषणातून स्फूर्ती घेतली त्यामध्ये बळवंतराव माने, शिदलिंग हविरे, दत्तोबा तांब्ट, माधवराव पार्टे इत्यादी स्वातंत्र सैनिकांचा समावेश होता.[५] १९३० साली गांधीनी कायदेभंगाचा आदेश दिला देशभर कायदेभंगाची चळवळ सुरु झाली. कोल्हापूर संस्थानात कायद्याने अशी चळवळ करण्यास बंदी होती तरीही गुजरी या कोल्हापूरातील सोन्या चांदीच्या बाजार पेठेमध्ये बळवंतराव माने व सिदलिंग हविरे या दोन प्रमुख कार्यकर्त्यांनी राजाराम महाराजांच्या समोर महात्मागांधीकी जय अशा घोषणा देऊन हातात तिरंगा ध्वज घेऊन गुजरीतून

मिरवणूक काढली व सत्त्याग्रह केला. संस्थानच्या १९३० च्या नोटीफिकेशन विरुध्द वर्तन केल्याबद्दल रा. बळवंतराव माने व शिदलिंग हविरे यांच्यावर येथील फर्स्टक्लास सिटी मॅजिस्ट्रट कोर्टात खटला चालून दोघांना एक महिना सक्त मजूरी व चाळीस रुपये दंडाची शिक्षा देण्यात आली.[६] बळवंतराव माने व शिदलिंग हविरे यांच्या बरोबर त्यांचे सहकारीही वाढू लागले. महादेव गायकवाड, माधवराव बागल, दत्तोबा तांबट, अनंतराव वडगांवकर, माधवराव पार्टे इत्यादी कार्यकर्ते हविरे व बळवंतराव माने यांना मदत करु लागले. १९३२ मध्ये कोल्हापूरमध्ये कोल्हापूर कॉंग्रेस कमिटीची वीर माने यांच्या अध्यक्षातेखाली स्थापना झाली[७] व संस्थानकडे भाषण स्वातंत्र्याचा अर्ज केला.[८] १९३२ साली महात्मा गांधीनी पुन्हा कायदे भंगाचा आदेश दिला यावेळीही बळवंतराव माने शिवलिंग हविरे, महादेव गायकवाड, राजाराम ससे, महादेव पार्टे, दत्तोबा तांबट, तुकदेव कुलकर्णी, दिनकरराव देसाई, राम आपटे, कृष्णा खटावकर, हणमंत वडेर, वसंतराव पाटील व इतर सहका-यांच्या साहाय्याने कोल्हापूरात पुन्हा कायदेभंगाची चळवळ सुरु करण्यात आली.[९] व पुणे व बेळगाव या ठिकाणी कोल्हापूरहून सत्त्याग्रहींच्या तुकडया रवाना करण्यात आल्या. यावेळी शेकडो सत्त्याग्रही कोल्हापूरच्यावतीने तुरुंगात पाठविण्यात आले.[१०] लोकांनी परदेशी बनावटीचे कापड वापरु नये म्हणून व त्यांच्यात स्वदेशीमालाबद्दल प्रेम उत्पन्न व्हावे यासाठी कोल्हापूरातील प्रसिध्द कापड व्यापारी गोविंद गोपाळ मिरजकर यांच्या दुकानासमोर पिकेटींग करण्याचा कार्यक्रम करण्यात आला. जनतेने खादीचे कापड वापरावे म्हणून शहरात व ग्रामीण भागात ठिकठिकाणी चरखा संघ स्थापन करण्यात आला.

माधवराव पार्टे यांच्याकडे ब्रिटीश हद्दीत कोल्हापूर मधून सत्याग्रही पाठविण्याचे काम होते. त्यांनी १०० ते १२५ जनांची तुकडी पुण्यास पाठविली.[११] या तुकडीचे नेतृत्व दत्तोबा तांबट यांनी केले व पुण्यात शनिवारवाडयासमोर तिरंगी झेंडा फडकविल्याबद्दल त्यांना १ वर्ष ६ महिन्याची सक्त मजूरीची शिक्षा झाली.[१२] अशाप्रकारे कोल्हापूर मध्ये स्वातंत्र्याच्या चळवळीस प्रारंभ झालेला होता व चळवळीमध्ये नवीन कार्यकर्ते सामील होत होते.

कोल्हापूरला १४ मे १९३५ रोजी डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी भेट दिली या वेळी त्यांची खासबाग मैदानात सभा झाली. या सभेत त्यांना कोल्हापूरच्यावतीने मानपत्र देण्यात आले व या मानपत्राचे वाचन माधवराव बागल यांनी केले. यावेळी सभेस सुमारे १० हजार लोक उपस्थित होते.[१३] या सभेचाही परिणाम कोल्हापूर मध्ये राजकीय चळवळीचा जोर वाढण्यास झाला आहे.

## करवीर व्याख्यानमालेची स्थापना

जनतेला स्वातंत्र्याच्या चळवळीची गरज लक्षात यावी व त्यांच्यात राष्ट्रभक्ती वाढावी या उद्देशाने दत्तोबा तांबट यांनी व माधवराव बागल यांच्या सहकार्याने कोल्हापूरमध्ये करवीर व्याख्यानमाला जून १९३७ मध्ये सुरु केली या व्याख्यानमालेत देशभरातील मान्यवर पुढाऱ्यांनी भाषणे केली त्यामध्ये वीर नरिमन, स.का. पाटील, अच्युतराव पटवर्धन, सेनापती बापट, काकासाहेब गाडगीळ, केशवराव जेधे, साने गुरुजी, युसुफ मेहरअल्ली इत्यादी देशभक्तांचा समावेश होता.[१४] अशाप्रकारे

सर्वमाध्यमातून चळवळीच्या प्रचाराचे कार्य सुरु होते. याचवेळी म्हणजे १९३७ मध्ये माधवराव बागल यांनी २००० लोकांच्या सह्या घेऊन जबाबदार राज्यपध्दतीची मागणी केली. व राजाराम महाराजांनी १८-८-१९३८ रोजी कोल्हापूर दरबार जाहिरनामा नं. २० ने कोल्हापूर संस्थानातील प्रजेला कायदेमंडळाचे हक्क देण्याचे आश्वासन दिले.[१५] याच वेळी शिरोळ पेटयातील शेतकऱ्यांचा शेतसारा कमी व्हावा यासाठी दत्तोबा तांबट, दिनकरराव देसाई, रावबा मिणचे, नानासाहेब जगदाळे, आण्णासाहेब पाटील, रत्नाप्पा कुंभार, माधवराव बागल यांनी चळवळ उभारण्याचे ठरविले. लोकांमध्ये जागृती व्हावी यासाठी सभा घेण्याचेही ठरले परंतु संस्थानी मुलखात सभा घेण्यास बंदी असल्यामुळे. संस्थाना-शेजारी असलेल्या ब्रिटीश हद्दीतील गांवामध्ये सभा घेण्याचे ठरले. १४-११-१९३८ रोजी सातारा जिल्हयातील धामणी गावी दक्षिणी संस्थान लोकसभेचे सरचिटणीस बा.वी. शिखरे यांच्या अध्यक्षतेखाली पहिली सभा घेण्यात आली. दुसरी सभा बेळगाव जिल्हयातील बोरगाव या गावी दिनांक २०-११-१९३८ रोजी झाली व तीसरी सभा २७-११-१९३८ रोजी उदगाव अंकली पुलालगतच्या एका झाडाखाली झाली.[१७] या सभांचा परिणाम होऊन कोल्हापूर दरबारने दिनांक ३०-११-१९३८ रोजी शिरोळ पेटयाचा शेतसारा सव्वासहा टक्के कमी केल्याचे जाहिर केले.[१६] दरबारने शेतसारा कमी केल्याबद्दल दरबारचे आभार मानण्यासाठी व चळवळीची पुढील दिशा ठरविण्याबाबत दि. ४-१२-१९३८ रोजी अंकली येथे दिनकरराव देसाई यांच्या अध्यक्षतेखाली सभा झाली. या सभेस पाच हजार लोक हजर होते. या सभेमध्ये १. डोईजड शेतसारा कमी व्हावा, २. संपूर्ण नागरिक स्वातंत्र्य मिळावे व ३. जबाबदार राज्यपध्दती

मिळावी अशा मागण्या निश्चित करण्यात आल्या.[१७] दिनांक १६-१२-१९३८ साली अंकली येथे शंकरराव देव यांची सभा झाली. या सभेस १५००० लोक हजर होते. दिनांक ४-१२-१९३८ रोजीच्या सभेत मान्य झालेल्या मागण्या मान्य करून घेण्यासाठी दि. २५-१२-१९३८ रोजी कोल्हापूर येथे राजाराम महाराजांकडे मोर्चा नेण्याचे निश्चित करण्यात आले.[१८]

ठरल्याप्रमाणे दि. २५-१२-१९३८ रोजी २५ हजारभर शेतकरी मोर्चासाठी म्हणून कोल्हापूर मध्ये दाखल झाले. यातील बहुसंख्य रेल्वेने आलेले होते. या मोर्चाचे नेतृत्व माधवराव बागल करीत होते. परंतु क्रि.पो.को. क. १०७ ने माधवराव बागल यांना रेल्वे स्टेशनवरच अटक करण्यात आली.[१९] यानंतर नानासाहेब जगदाळे यांनी मोर्चाचे नेतृत्व स्विकारले व त्यांनी आपल्या मागण्या दरबारचे दिवाण सुर्वे यांच्याकडे सादर केल्या.[२०] छत्रपती राजाराम महाराज कोल्हापूरात नसल्यामुळे दिवाण सुर्वे यांनी ८-१-१९३९ पर्यंत मागण्याचा योग्यविचार करतो असे सांगितले.[२१] व मोर्चा विसर्जित झाला. दिनांक ५-१-१९३९ ला दरबारने आपला जाहिरनामा प्रसिध्द केला. परंतु तो निराशाजनक आहे असे चळवळी- तील कार्यकर्त्यांना वाटल्यामुळे पुन्हा १५-१-१९३९ रोजी मोर्चासाठी हजारो लोक कोल्हापूरमध्ये दाखल झाले. हा मोर्चा यशस्वी होऊ नये म्हणून दरबारच्यावतीने दक्षता घेण्यात आली होती तरी सुध्दा लोक कोल्हापूर मध्ये आपल्या मागण्या मागण्यासाठी सिध्द झालेले होते.[२२] या मोर्चाला स्वत: राजाराम महाराज सामोरे गेले व त्यांनी १२ ते ४ वाजेपर्यंत भर उन्हामध्ये वाटाघाटी करून मोर्चाला पुढीलप्रमाणे वचन दिले की —

१. शेतसारा ब्रिटिश हद्दीइतका करण्यात आला आहे.

२. भाषण स्वातंत्र्यावरील निर्बंध काढून टाकण्यात आले आहेत.

३. नागरिक स्वातंत्र्याचे इतर हक्कही पंधरा दिवसांत गॅझेटद्वारा जाहिर केले जातील.

४. सर्व राजबंदी बिनशर्त मुक्त करण्याबाबत १५ दिवसांचे आत सहानुभूतीपूर्वक विचार केला जाईल.

५. जबाबदार राज्यपध्दती लवकरच देत आहोत.

अशा प्रकारचे आश्वासन घेऊन मोर्चा शांततेने विसर्जित झाला.[२३] भाई माधवराव बागल यांची सुटका दि. २३-१-१९३९ रोजी केली व २६-१-१९३९ रोजी भाषण व संघ स्वातंत्र्यावरील निर्बंध काढून टाकले. यावेळी संस्थानातील जनतेमध्ये जागृती व्हावी म्हणून दिनांक २५-१-१९३९ ते १-२-१९३९ पर्यंत एक आठवडाभर संस्थानचा दौरा काढून माधवराव बागल यांनी सुमारे ५० गांवामध्ये सभा घेतल्या व संस्थानात लोक जागृती करण्याचा प्रयत्न केला. तसेच दिनांक ६-२-१९३९ रोजी रात्री साडेनऊ वाजता कोल्हापूर संस्थानातील सर्व भागातील २००० कार्यकर्त्यांचा मेळावा रामचंद्र ऑईलमिल शिरोळ येथे माधवराव बागल यांचे अध्यक्षतेखाली सुरु झाला होता. सभा सुरु असतानाच राजद्रोहाच्या आरोपावरुन १२४ अ कलमाखाली माधवराव बागल यांना दरबारच्या पोलीसांनी अटक केली व ते त्यांना घेऊन गेले. माधवराव बागलांना अटक करुन नेले तरी ही सभा पुढे चालूच राहिली व या सभेत "कोल्हापूर संस्थान प्रजापरिषद" भरविण्याचे निश्चित करण्यात आले. या नियोजित प्रजापरिषदेची पूर्वतयारी करण्यासाठी तात्पुरती

प्रातिनिधिक समिती नेमण्यात आली.[२४] २५-२-१९३९ रोजी जयसिंगपूर येथे प्रजापरिषदेच्या स्वागत मंडळाची सभा झाली. या सभेस काँग्रेस वर्किंग कमिटीचे सदस्य शंकरराव देव यांनी मार्गदर्शन केले. तसेच या परिषदेत "कोल्हापूर संस्थानात श्रीमान् महाराज छत्रपती सरकार करवीर यांच्या आधिपत्याखाली न्याय व शांततेच्या मार्गाने संपूर्ण जबाबदार राज्यपध्दती स्थापन करणे" हे परिषदेचे ध्येय ठरविण्यात आले. याच सुमारास माधवराव बागल यांना देशद्रोहाच्या आरोपाखाली २ वर्षे सक्तमजूरी व रु. १००० दंडाची शिक्षा देण्यात आली.[२५] व सरकारने २९-३-१९३९ रोजी ज्यादा गॅझेट काढून कोल्हापूर संस्थान प्रजापरिषद ही संस्था बेकायदेशीर असल्याचे जाहिर करण्यात आले. त्यामुळे संस्थान हद्दित "प्रजापरिषदेचे अधिवेशान भरविता आले नाही. म्हणून करवीर इलाख्याच्या शेजारी खालसा हद्दीत कुपवाडच्या माळावर दिनांक १५-४-१९३९ रोजी प्रजापरिषदेचे पहिले अधिवेशान भरविण्यात आले. या अधिवेशानास सुमारे १०,००० लोक उपस्थित होते.[२६] परिषदेचे अध्यक्ष डॉ. पट्टाभिसितारामय्या हे होते. तसेच दिनकरराव देसाई हे स्वागताध्यक्ष होते व म.दु. श्रेष्ठी हे उपाध्यक्ष तर रत्नाप्पा कुंभार हे परिषदेचे सेक्रेटरी होते. या अधिवेशानात गंगाधरराव देशपांडे, शंकरराव देव, ना.ग. गोरे, बा.चि. शिखरे रत्नाप्पा कुंभार, दा.वि. गोखले इत्यादी स्वातंत्र्य सैनिकांनी भाषणे केली. परिषदेचे अध्यक्ष डॉ. पट्टाभीसीतारामय्या यांनी आपल्या भाषणांत सांगितले की -- "हिंदुस्थान एक आणि अविभाज्य असल्याने हिंदुस्थानातील शासनसंस्थाही एक आणि अविभाज्य असली पाहिजे. कलकत्ता काँग्रेसने संस्थानी प्रजेला जबाबदार राज्य-पध्दतीच्या लढयात नैतिक पाठबळ देण्याचा ठराव केला आहे."[२७] या अधिवेशानात एकूण तेरा ठराव मंजूर झाले त्यातील महत्वाचे ठराव पुढील

प्रमाणे होते. प्रजेला राजकीय हक्क द्यावेत. शेतकऱ्यांचा शेतसारा कमी करावा, छत्रपतींनी खाजगी खर्च कमी करावा. राखीव शिकार कुरणे मोकळी करावीत, जहागिर - रयतेच्या तक्रारी दूर कराव्यात, परिषदेवरील बंदी उठवावी, स्थानिक स्वराज्यसंस्था पूर्णपणे लोकनियुक्त असाव्यात, याचवेळी प्रजेपरिषदेला उत्तर म्हणून दरबारच्या प्रेरणेने व मदतीने कोल्हापूर रयत सभेची स्थापना करण्यात आली. या सभेचे अधिवेशन कदमवाडी येथे जून १९३९ मध्ये पार पडले. त्यामध्ये संस्थानी प्रजेच्या मागण्या संस्थानी प्रजा करेल त्या मागण्या महाराज मान्य करतील. परंतु संस्थानच्या बाहेरच्या मंडळींची संस्थानातील प्रजेला चिथावणी असू नये असे धोरण ठरविण्यात आले.[२८] करवीर रयत सभेच्या निर्मितीमुळे प्रजापरिषदेच्या चळवळीस खीळ बसेल असे दरबारी अधिकाऱ्यांना वाटत होते. परंतु तसे घडले नाही कारण प्रजापरिषदेची चळवळ ही पुढील काळात वाढतच राहिली व राजाराम महाराजांच्या निधनानंतर कोल्हापूर संस्थानात प्रमुख स्वातंत्र्याची चळवळ म्हणून मान्य पावली.

......

[library stamp]

## संदर्भ व टीपा


१. तु.बा.नाईक, छत्रपती राजर्षी शाहू महाराज, युनिव्हर्सल प्रकाशन, कोल्हापूर, प्र.आ., १९७४, पृ.१४६.

२. स.मा.गर्गे, करवीर रियासत, गो.य.राणे प्रकाशन, पुणे, द्वि. आ., १९८०, पृ.६४२-६४३.

३. अनंत विश्वनाथ पटवर्धन, [संपादक], संस्थानातील लोकशाहीचा लढा, १९५०, पृ.५१.

४. स्वातंत्र्यवीर माधवराव पाटें यांची मुलाखत, प्रहार, स्वातंत्र्य सैनिक खास अंक, आण्णा चव्हाण [संपादक], मार्च १९८२, पृ.३७.

५. आण्णा चव्हाण, [संपादक], प्रहार, स्वातंत्र्य सैनिक खास अंक, मार्च १९८२, पृ.३७.

६. किता, पृ.१५.

७. किता, पृ.१६.

८. माधवराव बागल, [संपादक], खंडेराव बागल यांचे निवडक लेख, दु.आ. पृ.३३७.

९. प्रहार : उपरोक्त, पृ.३३.

१०. किता, पृ.३३.

११. प्रहार : उपरोक्त, पृ. ३८.

१२. कित्ता, पृ. ३२.

१३. सत्यवादी : १५ मे १९३५.

१४. कित्ता, ९ जून १९३७.

१५. सत्यवादी, २४ ऑगस्ट १९३८.

१६. विश्वनाथ अनंत पटवर्धन, उपरोक्त, पृ. ४४.

१७. कित्ता, पृ. ४५.

१८. कित्ता, पृ. ४५.

१९. सत्यवादी : २८ डिसेंबर १९३८.

२०. कित्ता, २८ डिसेंबर १९३८.

२१. विश्वनाथ अनंत पटवर्धन, उपरोक्त, पृ. ४६.

२२. कित्ता, पृ. ४९.

२३. कित्ता, पृ. ४९.

२४. कित्ता, पृ. ४९.

२५. माधवराव बागल [संपादक], उपरोक्त, पृ. २३७.

२६. विश्वनाथ अनंत पटवर्धन, उपरोक्त, पृ. ५१.

२७. लालजी उपाध्ये, (संपादक) करवीर क्रांती, स्वातंत्र्य सैनिक गौरव ग्रंथ, स्मरणिका, १९७२, पृ. १२.

२८. कोल्हापूर अॅडमिनिस्ट्रेशन रिपोर्ट, १९३८-३९, पृ. २७.